Containment Zone ID – Raigad C.Z. ३९


RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖


क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना/रुग्ण/कोप्रोली पनवेल/ग्रीन हेवन/२०२० दिनांक : ८ /०५/२०२०.

**प्रति,**

**१. उप विभागीय अधिकारी पनवेल**
**२. उप विभागीय पोलीस अधिकारी, पनवेल**
**३. जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, रायगड-अलिबाग**
**४. तहसिलदार पनवेल.**
**५. गट विकास अधिकारी, पनवेल**

**विषय :- रायगड जिल्हयामध्ये ज्या ठिकाणी कोरोना विषाणु बाधीत रुग्ण आढळून आल्यास अशा ठिकाण व त्यांचा आजूबाजूचा परिसर Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र) म्हणून व प्रतिबंधक क्षेत्र म्हणून जाहिर केल्यानंतर त्या ठिकाणी करावयाची उपाययोजना**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी कळविण्यांत येते की, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यांत आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहे. शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1987 दिनांक 13/03/2020 रोजी लागू करण्यात आलेला आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत करोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत. करोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व करोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे, इत्यादी बाबी टाळणे अत्यावश्यक आहे. शासनाने कोरोना विषाणूचा ( COVID - १९ ) प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासुन लागु करुन, खंड २, ३, व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. तसेच संपूर्ण देशामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी मा.भारत सरकार यांनी दिनांक 3/5/2020 पर्यंत संचारबंदी व लॉकडाऊन लागू केलेले आहे.

रायगड जिल्हयामध्ये विविध ठिकाणी कोरोना बाधीत रुग्ण आढळून आलेले आहेत व येत आहेत. अशी ठिकाणे व त्याच्या आजूबाजूचा परिसर, यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी, विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी व त्यावर नियंत्रण मिळविणेसाठी तेथील क्षेत्र हे Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) म्हणून व प्रतिबंधक क्षेत्र म्हणून या कार्यालयाकडील आदेशान्वये वेळोवेळी जाहीर करण्यात येत आहे. अशा ठिकाणी अजून काटेकोरपणे कार्यवाही करणेसाठी व उपाययोजना करणेसाठी संबंधित विभागास खालीलप्रमाणे निर्देश देणेत येत आहे. रायगड जिल्हयातील पनवेल तालुक्यातील, कोप्रोली येथे १ व्यक्ती करोना विषाणु बाधीत आढळून आल्याने, कोप्रोली, ता.पनवेल येथील ग्रीन हेवन गृहनिर्माण संस्था, ई विंग ही इमारत Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र) म्हणून व प्रतिबंधक क्षेत्र म्हणून या कार्यालयाकडील आदेश दिनांक ०८/०५/२०२० अन्वये घोषित करणेत आलेले आहे. तरी सदरहू क्षेत्रात खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

**१. <u>उप विभागीय पोलीस अधिकारी/सहा. पोलीस आयुक्त :-</u>**

१.१ रायगड जिल्हयामध्ये ज्या ठिकाणी व त्याच्या आजूबाजूचा परिसर, हे Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) म्हणून व प्रतिबंधक क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे. अशी ठिकाणे बंद करणेत यावी.

१.२ बंद करणेत आलेल्या क्षेत्रामधील कोणत्याही व्यक्तीस प्रतिबंधक क्षेत्राच्या बाहेर जाण्यास, आंतमध्ये प्रवेश करण्यास व फिरण्यास मनाई करणेत यावे. तसेच सदरहु क्षेत्रामध्ये नगरीकांना / वाहनांच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यांत यावे.

१.३ प्रतिबंधक क्षेत्राच्या आतमध्ये कोणत्याही बाहेरील व्यक्तीस जीवनावश्यक वस्तुखेरीज जाणे-येणे अनुज्ञेय असणार नाही. त्यामध्ये वैद्यकीय पथकास नागरीकांची तपासणी करणे, तेथील क्षेत्राचे सर्वेक्षण करणे इत्यादी गोष्टी करणेसाठी प्रवेक्ष देणेत यावा. ज्या व्यक्तीस वैद्यकीस तपासणीची आवश्यकता आहे अशा व्यक्ती प्रतिबंधक क्षेत्राच्या बाहेर जाण्यास वैद्यकिय तपासणी पथकाच्या निर्देशानुसार मान्यता देणेत यावी.

१.४ संबंधित ग्रामपंचायत कर्मचारी यांना प्रतिबंधक क्षेत्रातील नागरीकांना जीवनावश्यक वस्तुचा पुरवठा करणेसाठी प्रस्तूत क्षेत्रात जोणे-येणेस मान्यता देणे, त्यासाठी पोलीस विभागाने आवश्यक त्या व्यक्तीचे पास देऊन व त्याप्रमाणे उपाय योजना करावी.

१.५ प्रतिबंध क्षेत्राच्या आतमध्ये व बाहेर जाणाऱ्या व्यक्तींची योग्य ती नोंद सर्व तपशिलासह ठेवण्यांत यावी.

१.६ आरोग्य तपासणीकामी नेमलेल्या पथकासाठी आवश्यक ती सुरक्षा उपाययोजना करण्यांत यावी.

१.७ शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सुचनांनुसार/निर्देशानुसार प्रतिबंधक क्षेत्रामध्ये ज्या व्यक्तीस/यंत्रणेस/ नागरीकास जाणे- येणे साठी मान्यता दिलेली आहे अशा व्यक्तीस/यंत्रणेस/नागरीकास आवश्यक ती उपाययोजना व शासनाने दिलेल्या निर्देशानुसार मान्यता देणेबाबत पुढील नियमानुसार कार्यवाही करावी.

**२. <u>जिल्हा आरोग्य विभाग :-</u>**

२.१ आरोग्य विभागातील कर्मचारी यांना प्रतिबंधक क्षेत्र म्हणून जाहिर केलेल्या ठिकाणी आवश्यक ती पथके नेमून त्या ठिकाणाचे सर्वेक्षण करावे.

२.२ तयार केलेल्या पथकान्वये सर्व नागरीकांची तपासणी करण्यांत यावी.